नि.फौ.ख.क्र.४८/२०२५
शासन विरुध्द विजय
नि.क्र.१६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – अशोक नामदेव गोळे,
वय – ४० वर्षे, कामधंदा - शेती,
नेमणुक– खालची बेलमाची, ता. वाई, जि.सातारा

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. आर. सुळ -**

मी माझ्या घरी माझी आई व पत्नी यांच्यासह राहतो. तसेच आमच्यासह माझ्या दोन्ही मुली राहायला आहेत. दि.१८.०६.२०२४ रोजी यमुना गणपत बाबर यांच्या शेतात मी दुपारी २.०० वाजताच्या सुमारास त्यांच्या शेतीतील काम करण्यास मी गेलो होतो. तसेच त्यावेळी माझे जोडीदार धनाजी शंकर धनावडे हेसुध्दा तेथे आले होते. त्यावेळी आरोपी विजय जाधव व वैशाली बाबर यांच्यात तेथील येण्याजाण्याच्या वाटेवरुन वाद सुरु होते. त्यामुळे मी व धनाजी आमची अवजारे घेवून तेथून आमच्या घराकडे परत निघालो. त्यावेळी बैलगाडीत अवजारे भरत असताना धनाजी हा बैलागाडीचे बैल धरून होता. तेवढयात माझ्या पाठीमागून आरोपी विजय जाधव तेथे आले आणि त्यांनी माझा गळा आवळला. त्यानंतर आम्ही दोघेही लागलीच आमच्या घराकडे निघून आलो.

२. त्यानंतर सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास आरोपी विजय यांचे चुलत भाऊ नामे शंकर जाधव तेथे म्हणजेच माझ्या घरासमोर आले. तेथील रस्त्यावरुन त्यांनी एक दगड उचलला आणि भिरकन माझ्या डोक्यामध्ये घातला. त्यानंतर आरडाओरडा झाल्याने शंकर तेथून पळून गेला. मला चक्कर आल्यासारखे झाले म्हणून मी पुढील अर्धा तास तेथेच माझ्या घरी थांबून होतो. त्यानंतर मी व माझा मुलगा विश्वजीत असे मिळून भुईज पोलीस ठाण्यात गेलो. तेथे मी घटनेची फिर्याद दिली. तेथील हवालदारने आम्हाला दवाखान्यात जाण्यास सांगितले होते. तेथे माझ्यावर रात्रीच्या १०.०० वाजेपर्यंत उपचार सुरु होते. त्यानंतर आम्ही आमच्या घरी परतलो. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १७** देण्यात येते. आता मला छापील एफआयआर दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी**

**क्र.१८** देण्यात येते. मला ज्या दगडाने मारहाण झाली होती तो दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला मुद्देमाल क्र. ६१/२०२५ दाखविण्यात आला. तो तोच दगड आहे. त्यास **आर्टीकल ए** देण्यात येते. तसेच मला आता मी घटनेच्यावेळी जो शर्ट घातला होता तो दाखविला. तो तोच असून त्यास **आर्टीकल बी** देण्यात येते. पोलीस माझ्याकडे आले होते. त्यावेळी त्यांनी पंचनामा कार्यवाही केली होती. तेव्हा त्यांनी पंचांना माझ्यासमक्ष विचारपूस केली होती. फोटो घेतले होते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे. घटनेनंतर मी पोलीस ठाण्यात जावून परत आल्यानंतर सुध्दा मला आरोपींनी शिवीगाळ केली होती. त्यावेळी ते तिघेही माझ्या घरात घुसले तेव्हा माझ्याघरी कोणीही पुरुष मंडळी नव्हती. आरोपी शंकर त्यावेळी दारु प्यायलेल्या अवस्थेत होता. त्याने अश्लील शब्दात शिवीगाळसुध्दा केली होती.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.डी.खामकर-**

३. हे म्हणणे खरे आहे की, वैशाली ही यमुना हिची सुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, यमुना व विजय यांच्यामध्ये असणा-या वादाबाबत मला वैयक्तीकरित्या माहिती नाही. मला वैशाली यांच्या शेतमिळकतीचा क्रमांक सांगता येणार नाही. तसेच आरोपी विजय यांच्या शेतमिळकतीचा क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, बेलमाची व किकली ही दोन्ही गावे एकमेकांशेजारी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे किकली येथील रहिवासी आहेत.

**प्रकरण पुढील उलटतपासाकरीता तहकुब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2026.01.12 15:00:42 +0530

दि.१२.०१.२०२६

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.